जा.क्र.नमुंमपा/उ.आ.(स्व.म.अ.)/ ९२३ /२०१६
दिनांक : २३ /११/२०१६

प्रति,
**सहा. आयुक्त / विभाग अधिकारी,**
--------------- विभाग,
नवी मुंबई महानगरपालिका

**विषय : सामुदायिक शौचालय देखभाल करण्याकरीता स्थापन करावयाच्या वस्ती समिती / मोहल्ला समिती सोबत करावयच्या करारनाम्याबाबत.**
**संदर्भ : मा. प्रविण प्रकाश, संयुक्त सचिव एवं मिशन निदेशक (एसबीएम), नगरविकास विभाग, भारत सरकार यांचे अर्धशासकीय पत्र क्र.No.१५/१२/२०१६-SBM-१, दि.२७/०५/२०१६**

**महोदय,**

उपरोक्त संदर्भ क्र. १ अन्वये स्वच्छ भारत मिशन (नागरी) अंतर्गत स्वच्छ सर्वेक्षण-२०१७ बाबतच्या सुचना व माहितीपत्र प्राप्त झाल्या आहेत. सदर "स्वच्छ सर्वेक्षण-२०१७" च्या माहिती पत्रकातील प्रश्नावली नुसार नवी मुंबई महानगरपालिकेचे सिटी रँकिंगमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने नियोजन करून निकषाप्रमाणे अंमलबजावणी करणे आवश्यक आहे. त्याअनुषंगाने नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील सामुदायिक शौचालयांची देखभाल वस्ती समिती / मोहल्ला समिती मार्फत केल्यास गुणांकनामध्ये वाढ होणार आहे.

त्याअनुषंगाने सामुदायिक शौचालय देखभाल करण्याकरीता स्थानिक वस्ती समिती / मोहल्ला समिती स्थापन करावयाची आहे. सदर समिती सोबत करावयाच्या करारनाम्याच्या नमुन्यास मा. आयुक्त यांनी दिनांक २१/११/२०१६ रोजी झालेल्या बैठकीत मान्यता दिली असून सदर करारनाम्याचा नमुना या पत्रासोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

तरी वरीलप्रमाणे सामुदायिक शौचालय देखभाल करण्याकरीता स्थानिक वस्ती समिती / मोहल्ला समिती स्थापन करून त्याबाबतचा अनुपालन अहवाल या कार्यालयास विनाविलंब सादर करण्यात यावा.

DMC (SMM)

**सोबत** :- वरीलप्रमाणे.

आवक क्र. ९१२३ दिनांक २४/११/२०१६

**उप आयुक्त (स्व.म.अ.)**
**नवी मुंबई महानगरपालिका**

**प्रत** :- १) मा. अतिरिक्त आयुक्त (शहर / सेवा) यांना माहितीस्तव सादर.
२) उप आयुक्त (परिमंडळ-१ व २) यांना माहितीस्तव व कार्यवाहीस्तव.